जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७४ दिनांक - ३०/०६/२०२३**

## युनिट-४ गुन्हे शाखा,पुणे शहर

## दुचाकी चोरणा-या सराईत चोरट्यांकडून वाहन चोरीचे पाच गुन्हे उघडकीस

दिनांक २८/०६/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट ४ कडील पोलीस पथक असे मा. पोलीस निरीक्षक गणेश माने यांचे सुचनान्वये खडकी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस अंमलदार अजय गायकवाड,सारस साळवी यांना** त्यांचे बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, पुणे शहरात वेगवेगळया ठिकाणाहुन रात्रीच्या वेळी हॅन्डल लॉक तोडुन दुचाकी चोरुन त्यांच्या नंबर प्लेट काढुन त्या दुचाकी वापरणारे दोघे जण औंध रोड वरिल खडकी रेल्व स्टेशन जवळ थांबले आहेत.

अशा मिळालेल्या बातमी प्रमाणे मा.पो.नि.गणेश माने यांनी बातमीच्या ठिकाणी जाऊन कारवाई करणे बाबत सुचना व मार्गदर्शन केले.त्याप्रमाणे युनिट-४ कडील पोलीस स्टाफने सापळा रचुन एका नंबर प्लेट नसलेल्या होन्डा ॲक्टीव्हा स्कुटर वरील दोन संशयित **१)रोहन ऊर्फ बॉन्ड बाळ्या अशोक म्हेत्रे,वय २२ वर्षे,रा.शनिनगर,दत्तनगर,जांभुळवाडी रोड,कात्रज पुणे २)अक्षय ऊर्फ वाश्या भारत वाघमारे,वय २३ वर्षे,रा.अप्पर इंदीरानगर,व्हिआयटी कॉलेज जवळ,बिबवेवाडी,पुणे** यांना चोरीच्या स्कुटर सह ताब्यात घेतले. त्यांचेकडे अधिक तपास करता दोघांनी मिळुन पुणे शहरात रात्रीच्या वेळी बुधवार पेठ, बिबवेवाडी, कात्रज,उंन्ड्री,स्वारगेट,दांडेकर पुल येथे वाहने चोरी केल्याचे कबुल केले आहे.

त्यांना अधिक विश्वासात घेऊन त्यांचे ताब्यातुन एकुण ०३ होंन्डा ॲक्टीव्हा,०२ डीओ व ०१ हिरो स्प्लेंन्डर मो.सायकल अशा एकुण ३,१०,०००/- रुपये किंमतीच्या ६ दुचाकी जप्त करुन १)**फरासखाना पोलीस ठाणे गु.र.नं.९९/२०२३,भा.द.वि.कलम ३७९ २)स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं.१६७/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ ३)पर्वती पोलीस ठाणे गु.र.नं.१७१/२०२३ भा.द.वि.कलम ३७९,३४ ४)भारती विद्यापिठ पोलीस ठाणे गु.र.नं.४०९/२०२३,भा.द.वि.कलम ३७९ ५)कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.६३२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९** प्रमाणे दाखल गुन्हे उघडकीस आले आहेत. होंडा ॲक्टीव्हा एम.एच.१२ एच.टी.५५२० या गाडीचे मालकाचा शोध घेत आहोत.

सदर आरोपी व जप्त मुद्देमाल हा पुढील कारवाई कामी फरासखाना पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर, पोलीस निरीक्षक,श्री.गणेश माने यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक,विकास जाधव, पोलीस फौजदार,महेंद्र पवार, पोलीस अंमलदार, शितल शिंदे,अजय गायकवाड,प्रविण भालचिम, सारस साळवी, मनोज सांगळे, स्वप्निल कांबळे, शितल शिंदे यांनी केली आहे.


गुन्हे शाखा
पुणे शहर
युनिट क्र.४
ई - ५, रेंजहिल्स, खडकी,
पुणे - २०
फोन नं. २६२०८४६५
Crime Branch
Pune City
UNIT NO. 4
E-5, Rangehills Road, Khadki,
Pune - 20
PH NO. 26208465